RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ९९] शुक्रवार, जुलै १४, २०२३/आषाढ २३, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २६९**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, नवीन मंत्रालय,
मुंबई ४०० ००१, दिनांक १४ जुलै २०२३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५.**

क्र.एमईडी. १०२३/प्र.क्र.३७/२३/शि-२.—महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ च्या कलम २८ च्या उप-कलम (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र वैद्यक परिषदेशी सल्लामसलत करून याद्वारे पुढील सुधारणा करीत आहे :—

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ च्या अनुसूचित दर्शविलेल्या खालील नोंदी रद्द करण्यात येतील.

| | |
|---|---|
| नोंद क्र.१ | औषधशास्त्र, शरीरविकृतीशास्त्र, शल्यचिकित्साशास्त्र किंवा चर्मरोगशास्त्र या विषयांसाठी दिनांक १ एप्रिल, १९५४ पूर्वी देण्यात आलेली मुंबई येथील भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयाची अधिछात्रवृत्ती |
| नोंद क्र.२ | औषधशास्त्र, शरीरविकृतीशास्त्र, शल्यचिकित्साशास्त्र किंवा चर्मरोगशास्त्र या विषयांखेरीज इतर कोणत्याही विषयांसाठी मुंबई येथील भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयाची अधिछात्रवृत्ती |
| नोंद क्र.३ | मुंबई येथील भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयाचा सदस्य (दिनांक ३० एप्रिल, १९४४ पूर्वी प्रवेश देण्यात आलेला) |
| नोंद क्र.१९ | डी.ओ.एम.एस.- नेत्र औषधशास्त्र व शल्यचिकित्साशास्त्र यातील पदविका |
| | डी.डी.व्ही.- त्वचा व गुप्तरोग यातील पदविका |
| | डी.ओ.आर.एल.- कर्ण व स्वरयंत्र यातील पदविका |
| | डी.ऑर्थो.- अस्थिव्यंगोपचार पदविका |
| | टी.डी.डी.- क्षयरोग पदविका |

| | |
|---|---|
| | डी.पी.एम.- सायकोलॉजिकल औषधशास्त्र पदविका |
| | डी.एम.आर.ई.- वैद्यकीय क्ष-किरण व इलेक्ट्रोलॉजी पदविका |
| | डी.जी.पी.- सामान्य व्यवसाय पदविका |
| | एफ.सी.पी.एस.- बाल आरोग्य |
| | एफ.सी.पी.एस.- त्वचा व गुप्त रोग |
| | एफ.सी.पी.एस.- कर्ण व स्वरयंत्र |
| | एफ.सी.पी.एस.- बधिरीकरण |
| नोंद क्र.२७ | औषधवैद्यकशास्त्र या विषयातील, भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयातील अधिछात्रवृत्ती |
| | शल्यचिकित्साशास्त्र या विषयातील, भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयातील अधिछात्रवृत्ती |
| | प्रसुतीशास्त्र व स्त्रीरोगशास्त्र या विषयातील, भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयातील अधिछात्रवृत्ती |
| | स्त्रीरोगशास्त्र व प्रसुतीशास्त्र या विषयातील पदविका |
| | बालआरोग्य या विषयातील पदविका |
| | विकृतीशास्त्र व अणुजीवशास्त्र या विषयातील पदविका |
| | सार्वजनिक आरोग्य या विषयातील पदविका |
| | कुटुंब नियोजन या विषयातील पदविका |
| | बधिरीकरणशास्त्र या विषयातील पदविका |
| | संक्रामक औषधवैद्यकशास्त्र या विषयातील पदविका |
| | उष्णकटीबंधी औषधवैद्यकशास्त्र व आरोग्य या विषयातील पदविका |

**टीपः**

१. सदर अधिसूचनेतील तरतूदी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून लागू राहतील.

२. सदर अधिसूचना **राजपत्रात** प्रकाशित होण्यापूर्वी उपरोक्त नोंदीतील अभ्यासक्रमांना प्रवेशित झालेल्या उमेदवारांना सदर अधिसूचनेतील तरतूदी लागू होणार नाहीत.

३. अनुसूचीमधील उपरोक्त नमूद अभ्यासक्रमांना अधिसूचना प्रसिद्ध होण्यापूर्वी प्रवेशित झालेले, अभ्यासक्रम पूर्ण केलेले किंवा यथास्थिती परीक्षा उत्तीर्ण करणारे सर्व उमेदवार व सदर अनुसूची अंतर्गत वैद्यक व्यवसायी म्हणून महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी झालेल्या संबंधितांना परिषदेकडे नोंदणी करण्यास अथवा यथास्थिती नोंदणीचे नूतनीकरण करण्यास कोणतीही बाधा येणार नाही.

४. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ च्या अनुसूची नोंद क्र.१, २, ३, १९ व २७ मध्ये नमूद कॉलेज ऑफ फिजिशिअन्स अँड सर्जन्स, मुंबई या संस्थेच्या अर्हतांना याद्वारे सदर अनुसूचीतून वगळण्यात येत असल्याने महाविद्यालये/ रुग्णालये/ संस्था यांनी सदर अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. अश्विनी जोशी,**
शासनाच्या सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital Complex, New Mantralaya,
Mumbai 400 001, dated the 14th July 2023

*NOTIFICATION*

Maharashtra Medical Council Act, 1965.

No. MED-1023/CR 37/23/EDU-2.—In exercise of the power conferred by sub-section (*2*) of Section 28 of the Maharashtra Medical Council Act, 1965, the State Government after consulting the Maharashtra Medical Council, hereby makes the following further amendments in the schedule of the Act, namely:—

In the schedule of the Maharashtra Medical Council Act, 1965, following entries appearing under 'THE SCHEDULE', shall be deleted.

| | |
|---|---|
| Entry 1 | Fellowship of the College of Physicians & Surgeons, Bombay, in Medicine, Pathology, Surgery or Dermatology granted before the 1st April, 1954. |
| Entry 2 | Fellowship of the College of Physicians & Surgeons, Bombay, in any subject other than Medicine, Pathology, Surgery or Dermatology. |
| Entry 3 | Member of the College of Physicians & Surgeons, Bombay (admitted before the 30th April, 1994). |
| Entry 19 | Diploma in Ophthalmic Medicine & Surgery. (D.O.M.S.) |
| | Diploma in Dermatology & Venereology (D.D.V.) |
| | Diploma in Oto-Rhino-Laryngology (D.O.R.L.) |
| | Diploma in Orthopedics. (D. ORTHO) |
| | Diploma in Tuberculosis Diseases. (T.D.D.) |
| | Diploma in Psychological Medicine. (D.P.M.) |
| | Diploma in Medical Radiology and Electrology. (D.M.R.E.) |
| | Diploma in General Practice. (D.G.P.) |
| | Fellowship of the College of Physicians and Surgeons in Child Health. [F.C.P.S. (Child Health)] |
| | Fellowship of the College of Physicians and Surgeons in Dermatology & Venereology. [F.C.P.S. (Der. & Vene.)] |
| | Fellowship of the College of Physicians and Surgeons in Oto- Rhino- Laryngology |
| | Fellowship of the College of Physicians and Surgeons in Anesthesiology. [F.C.P.S. (Anae.)] |
| Entry 27 | Fellowship of the College of Physicians and Surgeons in Medicine [F.C.P.S. (Medicine)] |
| | Fellowship of the College of Physicians and Surgeons in Surgery [F.C.P.S. (Surgery)] |
| | Fellowship of the College of Physicians and Surgeons, in Midwifery and Gynaec [F.C.P.S. (Midwifery and Gynaec)] |
| | Diploma in Gynecology and Obstetrics (D.G.O.) |
| | Diploma in Child Health (D.C.H.) |
| | Diploma in Pathology and Bacteriology (D.P.B.) |
| | Diploma in Public Health (D.P.H.) |
| | Diploma in Family Planning (D.F.P.) |
| | Diploma in Anesthesiology (D.A.) |
| | Diploma in Transfusion Medicine (D.T.M.) |
| | Diploma in Tropical Medicine and Health (D.T.M. and H.) |

*Note:*

1. This shall come into force from the date of its publication in the *Official Gazette*.

2. This shall not be applicable to the candidates who have been admitted to the above mentioned courses prior to publication of this notification in the *Official Gazette*.

3. The candidates who have been admitted prior to publication of this notification for qualification recognized under the Schedule and the candidates to whom such diploma/s or fellowship/s have been awarded, and the candidates who are registered under State Medical Council shall not be barred from registration with the Council or renewal of registration with the Council, as the case may be.

4. The qualifications conferred by the College of Physicians and Surgeons, Mumbai and laid down under entry 1, 2, 3, 19 & 27 of the Schedule have been derecognized/deleted from Schedule of Maharashtra Medical Council Act, 1965 and therefore, the Colleges/hospitals/institutes shall not admit any candidates to the courses under said entries.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. ASHWINI JOSHI,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.